**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, धुळे**
**कंत्राटी पद्धतीने विविध पदभरतीसाठी जाहिरात 2019**
**जाहिरात क्रमांक - 01/2019**

जा.क्र. एमएसआरएलएम /धुळे/66A/2019 दि. 17/06/2019

**वाचा:-**

1. एमएसआरएलएम/एचआर /प्र.क्र.-436/949/2017 दि. 17/04/2017.
2. शासन निर्णय क्र. मजिअ 2107/प्र.क्र./59/योजना- 3 दि. 7 जुलै 2017.
3. म.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचे कडील पत्र क्र. एमएसआरएलएम/HR /प्र.क्र.-40/657/2018 दि. 15/03/2018.
4. म.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचे कडील पत्र क्र. एमएसआरएलएम/HR /प्र.क्र.-41/656/2018 दि. 15/03/2018

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, धुळे मार्फत इंटेन्सीव्ह तालुक्यात स्वयंसहाय्यता समुहाची स्थापना, सक्षमीकरण, बळकटीकरण, संगोपन, क्षमताबांधणी इ. कामे करण्यासाठी कंत्राटी पद्धतीने 11 महिन्यांच्या कालावधीकरीता जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील प्रभाग समन्वयक (Cluster Co-Ordinator) व सहायक कर्मचा-यांची रिक्त असलेली पदे भरण्याकरीता अर्हताप्राप्त उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईनपध्दतीनेच **www.drdadhuleexam.com** या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.
सदर पदे केवळ मानधनी व कंत्राटी असल्यामुळे कधीच शासकिय सेवेमध्ये कायम करण्यात येणार नाहीत.

| **ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात** | **ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत** |
|---|---|
| दिनांक - 24/06/2019 रोजी दुपारी 12.00 पासून | दिनांक - 08/07/2019 सायंकाळी 05.30 पर्यंत |

**बँकेत रोखीने किंवा ऑनलाईन पद्धतीने परीक्षाशुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक 10/07/2019**

कंत्राटी पद्धतीने भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहीरात **www.dhule.nic.in, www.umed.in** व **www.drdadhuleexam.com** व **www.dhulezp.mahapanchayat.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहीती काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहित चलनाद्वारे भरलेले परिक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करणे तसेच शैक्षणिक व अनुभव निकषांत बदल करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. तथा जिल्हा अभियान संचालक, धुळे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

**संवर्ग निहाय रिक्त पदे**

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षातील मार्फत रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे

**प्रभाग समन्वयक (Cluster Co-Ordinator)** (जिल्हा परिषद प्रभागाकरिता तालुका कक्षातील पदे) मानधनः- रु. 20500/-

| **जातप्रवर्ग** | **रिक्त पद संख्या** | **महिला 30%** | **माजी सैनिक 15%** | **खेळाडू 5%** | **प्रकल्प ग्रस्त 5%** | **भूकंप ग्रस्त 2%** | **अंशकालीन 10%** | **अनाथ 1%** | **समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर** | **अपंग 4 %** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अनु. जाती** | 04 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | **2 पदे अपंग संवर्गात आरक्षित आहेत. (OL, LV)** |
| **अनु. जमाती** | 12 | 4 | 2 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 3 | |
| **विमुक्त जाती (अ)** | 02 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | |
| **भ ज (ब)** | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | |
| **भ ज (क)** | 02 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | |
| **भ ज (ड)** | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | |
| **विशेष मागास प्रवर्ग** | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | |
| **इतर मागासवर्गीय** | 04 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | |
| **एसईबीसी** | 09 | 3 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 4 | |
| **इडब्ल्यूएस** | 05 | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | |
| **खुला** | 12 | 4 | 2 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 3 | |
| **एकूण** | 53 | 17 | 8 | 2 | 2 | 0 | 4 | 0 | 20 | |

वरील एकुण पदांपैकी 2 पदे अपंग संवर्गात आरक्षित आहे.(OL, LV)

**लेखापाल (Accountant)** (जिल्हा कक्षातील पद) मानधनः- रु. 15000/-

| जातप्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खुला | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 |
| एकूण | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 |

**प्रशासन सहाय्यक (Admin Assistant)** (जिल्हा कक्षातील पद) मानधनः- रु. 15000/-

| जातप्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खुला | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 |
| एकूण | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 |

**डेटा एन्ट्री ऑपरेटर (Data Entry Operator)** (जिल्हा कक्षातील पद) मानधनः- रु. 10000/-

| जातप्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खुला | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 |
| एकूण | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 |

**शिपाई (Peon)** (जिल्हा कक्षातील पद) मानधनः- रु. 8000/-

| जातप्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खुला | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 |
| एकूण | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 |

**प्रशासन व लेखा सहाय्यक (Admin & Account Assistant)** (तालुका कक्षातील पदे) मानधनः- रु. 15000/-

| अ. क्र. | प्रवर्ग | पदसंख्या | सर्व-साधारण | अपंग ४ % | प्रकल्प -ग्रस्त ५ % | भूकंप ग्रस्त २% | खेळाडू ५% | अशं कालीन १०% | माजी सैनिक १५% | महिला ३० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | ९ | १० |
| १ | अ.जा. | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | अ.ज. | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ३ | विमूक्त जाती -अ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | भटक्या जमाती -ब | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | भटक्या जमाती-क | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | भटक्या जमाती -ड | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | विशेष मागास प्रवर्ग | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ५ | इ.मा.व. | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसइबीसी) | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ०० | ० | ० |
| ७ | EWS | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ८ | खुला | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ० |
| | एकुण | ०४ | ०४ | ० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ० |

**डेटा एन्ट्री ऑपरेटर (Data Entry Operator)** (तालुका कक्षातील पदे) मानधनः- रु. 10000/-

| अ. क्र. | प्रवर्ग | पदसंख्या | सर्व-साधारण | अपंग ४ % | प्रकल्प -ग्रस्त ५ % | भूकंप ग्रस्त २% | खेळाडू ५% | अशं कालीन १०% | माजी सैनिक १५% | महिला ३० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | ९ | १० |
| १ | अ.जा. | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | अ.ज. | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ३ | विमूक्त जाती -अ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | भटक्या जमाती -ब | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | भटक्या जमाती-क | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | भटक्या जमाती -ड | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | विशेष मागास प्रवर्ग | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ५ | इ.मा.व. | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसइबीसी) | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ०० | ० | ० |
| ७ | EWS | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ८ | खुला | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ० |
| | एकुण | ०४ | ०४ | ० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ० |

**शिपाई (Peon)** (तालुका कक्षातील पदे) मानधनः- रु. 8000/-

| अ. क्र. | प्रवर्ग | पदसंख्या | सर्व-साधारण | अपंग ४ % | प्रकल्प -ग्रस्त ५ % | भूकंप ग्रस्त २% | खेळाडू ५% | अशं कालीन १०% | माजी सैनिक १५% | महिला ३० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | ९ | १० |
| १ | अ.जा. | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | अ.ज. | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ३ | विमूक्त जाती -अ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | भटक्या जमाती -ब | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | भटक्या जमाती-क | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | भटक्या जमाती -ड | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | विशेष मागास प्रवर्ग | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ५ | इ.मा.व. | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसइबीसी) | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ०० | ० | ० |
| ७ | EWS | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ८ | खुला | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ० |
| | एकुण | ०४ | ०४ | ० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ० |

**टिपः-**

1. समांतर आरक्षणासंदर्भात दर्शविण्यात आलेली पदसंख्या स्वतंत्र नाही. सदर आरक्षण त्या त्या प्रवर्गातील एकूण पदांपैकी आहे. समांतर आरक्षणापैकी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवाराद्वारे सदरचे पद भरले जाईल.
2. सदर पदांमध्ये कमी जास्त बदल होण्याचा संभव आहे व याबद्दल उमेदवारांची कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही.
3. उमेदवारांना वेगवेगळ्या पदांसाठी वेगवेगळा अर्ज सादर करणे बंधनकारक राहील. तथापी एकाच वेळेस वेगवेगळ्या पदांची परीक्षा घेण्यात आल्यास एकाच पदाच्या परिक्षेसाठी उमेदवारास स्वच्छेने बसता येईल. या बाबत कोणतीही तक्रार वा दावा करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
4. डेटा एन्ट्री ऑपरेटर (Data Entry Operator) व शिपाई (Peon) हि पदे जिल्हा कक्ष व तालुका कक्षातील पदे आहेत. गुणवत्ता तसेच सामाजिक व समांतर आरक्षणानुसार निवड व नियुक्ति करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. तथा जिल्हा अभियान संचालक, धुळे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. त्याबाबत उमेदवारांना कोणताही दावा सांगता येणार नाही.

**आवश्यक शैक्षणिक अर्हता / अनुभव**

खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव 01/06/2019 या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पूर्णधारण करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| **1 प्रभाग समन्वयक** (Cluster Co-Ordinator) (जिल्हा परिषद प्रभागाकरिता तालुका कक्षातील पदे) | 1. उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. (B.S.W.) अथवा (B.Sc. Agriculture) अथवा (M.S.W.) **अथवा** Master in Business Administration (M.B.A.) **अथवा** PG in Rural Development **अथवा** PG in Rural Management यापैकी शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांस प्राधान्य राहील.<br>3. उमेदवार महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39 दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्यांपैकी संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. (संगणक व लॅपटॉप हाताळणीचे ज्ञान असणे आवश्यक)<br>4. उमेदवाराला पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्षे इतका संबंधित कामाचा (खाली नमूद केल्याप्रमाणे) अनुभव आहे काय? (किमान 3 वर्षे संबंधित कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र आवश्यक.)<br>Minimum 3 yeas relevant work experience in the area of social mobilization and institution building with vulnerable groups such as Woman . Differently- abled , SC / STs and other under privileged sections in Rural Development / Social Mobilization / Poverty Alleviation / Livelihoods promotion programme. Relevant work experience should be considered / calculated after completion of Gradation . |
| **2 लेखापाल** (Accountant) (जिल्हा कक्षातील पद) | 1. उमेदवार वाणिज्य शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. उमेदवार Tally ची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>3. उमेदवार महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39 दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्यांपैकी संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>4. उमेदवाराला पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्षे इतका लेखाविषयक कामाचा अनुभव असणे आवश्यक. (किमान 3 वर्षे संबंधित कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र आवश्यक.) |
| **3 प्रशासन सहाय्यक** (Admin Assistant) (जिल्हा कक्षातील पद) | 1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. उमेदवार टंकलेखन इंग्रजी किमान 40 शब्द प्रति मिनीट (WPM) आणि मराठी 30 शब्द प्रति मिनीट (WPM) हि शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>3. उमेदवार महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39 दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्यांपैकी संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>4. उमेदवाराला पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्षे इतका प्रशासकिय कामाचा अनुभव असणे आवश्यक. (किमान 3 वर्षे संबंधित कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र आवश्यक.) |
| **4 प्रशासन व लेखा सहाय्यक** (Admin & Account Assistant) (तालुका कक्षातील पदे) | 1. उमेदवार वाणिज्य शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. उमेदवार टंकलेखन इंग्रजी किमान 40 शब्द प्रति मिनीट (WPM) आणि मराठी 30 शब्द प्रति मिनीट (WPM) हि शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>3. उमेदवार Tally ची परीक्षा उत्तीर्ण उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>4. उमेदवार महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39 दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्यांपैकी संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>5. उमेदवाराला पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्षे इतका प्रशासकिय व लेखाविषयक कामाचा अनुभव असणे आवश्यक. (किमान 3 वर्षे संबंधित कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र आवश्यक.) |
| **5 डेटा एन्ट्री ऑपरेटर** (Data Entry Operator) (जिल्हा कक्षातील पद व तालुका कक्षातील पदे) | 1. उमेदवार माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण (S.S.C.)<br>2. उमेदवार टंकलेखन इंग्रजी किमान 40 शब्द प्रति मिनीट (WPM) आणि मराठी 30 शब्द प्रति मिनीट (WPM) हि शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>3. उमेदवार महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39 दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्यांपैकी संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>4. उमेदवाराला माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्षे इतका डेटा एन्ट्री ऑपरेटर (संगणक परिचालन) कामाचा अनुभव असणे आवश्यक. (किमान 3 वर्षे संबंधित कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र आवश्यक.) |
| **6 शिपाई** (Peon) (जिल्हा कक्षातील पद व तालुका कक्षातील पदे) | 1. उमेदवार माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण (S.S.C.)<br>2. उमेदवाराला माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्षे इतका शासकिय कार्यालय /संस्था /कंपनी मधील कामाचा अनुभव असणे आवश्यक. (किमान 3 वर्षे संबंधित कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र आवश्यक.) |

**टिपः**

अनुभव प्रमाणपत्र मोघम नसावे. अनुभव प्रमाणपत्रावर संस्थेचा/कार्यालयाचा शिक्का व स्वाक्षरी तसेच जावक क्र. असणे आवश्यक आहे. तरच संबंधित पदाचा अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. तसेच मानधन / वेतन मिळाल्याचा तपशील मागणी केला जाऊ शकतो याची नोंद घ्यावी.

**वयोमर्यादा**

वयोमर्यादेकरीता उमेदवाराचे दिनांक 01/06/2019 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

सर्वसाधारण उमेदवाराचे वय दिनांक 01/06/2019 रोजी **18** वर्षा पेक्षा कमी नसावे व **38** वर्षा पेक्षा जास्त नसावे..

| अ.क्र. | आरक्षण/ समांतर आरक्षण | शासननियमा नूसार आरक्षणांकरिता कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| 1 | मागासवर्गीय उमेदवार | 43 वर्षे |
| 2 | अपंग उमेदवार | 45 वर्षे |
| 3 | प्रकल्पग्रस्त | |
| 4 | भुकंपग्रस्त | |
| 5 | माजी सैनिक | |
| 6 | अंशकालीन कर्मचारी | 46 वर्षे |
| 7 | उच्च गुणवत्ताधारक खेळाडु उमेदवार | खुला प्रवर्ग 43 वर्षे |
| | | मागासवर्गीय 43 वर्षे |

माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांकः मासैक-1010/प्र.क्र.279/10/16-अ, दिनांक 20 ऑगस्ट, 2010 प्रमाणे राहील.

**परिक्षेचे स्वरुप**

| अ.क्र | पदनाम / संवर्ग | परिक्षेसाठी गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | तोंडी परिक्षा | एकूण गुण |
| 1 | प्रभाग समन्वयक (Cluster Co-Ordinator) (जिल्हा परिषद प्रभागाकरिता तालुका कक्षातील पदे) | 80 | 20 | 100 |
| 2 | लेखापाल (Accountant) (जिल्हा कक्षातील पद) | 100 | -- | 100 |
| 3 | प्रशासन सहाय्यक (Admin Assistant) (जिल्हा कक्षातील पद) | 100 | -- | 100 |
| 4 | प्रशासन व लेखा सहाय्यक (Admin & Account Assistant) (तालुका कक्षातील पदे) | 100 | -- | 100 |
| 5 | डेटा एन्ट्री ऑपरेटर (Data Entry Operator) (जिल्हा कक्षातील पद व तालुका कक्षातील पदे) | 100 | -- | 100 |
| 6 | शिपाई (Peon) (जिल्हा कक्षातील पद व तालुका कक्षातील पदे) | 100 | -- | 100 |

**प्रश्नपत्रिकेचे स्वरुप**

| अ.क्र | पदनाम / संवर्ग | गुण |
|---|---|---|
| 1 | प्रभाग समन्वयक (Cluster Co-Ordinator) (जिल्हा परिषद प्रभागाकरिता तालुका कक्षातील पदे) | लेखी परिक्षेमध्ये मराठी - 14 गुण, इंग्रजी - 14 गुण,<br>सामान्य ज्ञान - 14 गुण, बौध्दीक चाचणी - 14 गुण,<br>सामाजिक शास्त्रे - 14 गुण व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान - 10 गुण याप्रमाणे 80 गुणांची लेखी परिक्षा व 20 गुणांची मुलाखत घेण्यात येईल असे एकुण 100 गुणाची परिक्षा होईल. |
| 2 | लेखापाल (Accountant)<br>(जिल्हा कक्षातील पद) | लेखी परिक्षे मध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दीक चाचणी, वाणिज्य/संगणक ज्ञान, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या विषयावरील प्रश्नांकरिता 100 गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. |
| 3 | प्रशासन सहाय्यक (Admin Assistant)<br>(जिल्हा कक्षातील पद) | लेखी परिक्षे मध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दीक चाचणी, संगणक ज्ञान, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या विषयावरील प्रश्नांकरिता 100 गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. |
| 4 | प्रशासन व लेखा सहाय्यक (Admin & Account Assistant)<br>(तालुका कक्षातील पदे) | लेखी परिक्षे मध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दीक चाचणी, वाणिज्य/संगणक ज्ञान, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या विषयावरील प्रश्नांकरिता 100 गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल |
| 5 | डेटा एन्ट्री ऑपरेटर (Data Entry Operator)<br>(जिल्हा कक्षातील पद व तालुका कक्षातील पदे) | लेखी परिक्षे मध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दीक चाचणी, संगणक ज्ञान, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या विषयावरील प्रश्नांकरिता 100 गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. |
| 6 | शिपाई (Peon)<br>(जिल्हा कक्षातील पद व तालुका कक्षातील पदे) | लेखी परिक्षे मध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या विषयावरील प्रश्नांकरिता 100 गुणांची लेखी परिक्षा घेण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | येईल. |
| वर नमूद केल्याप्रमाणे विषयांचे गुण अंदाजीत असून प्रश्नपत्रिकेची एकूण गुणसंख्या स्थिर ठेऊन विषय व विषयाचे गुण कमी अधिक होऊ शकतील याची नोंद घ्यावी. | | |

1. लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.
2. वरील पदक्रमांक 1 करीता मुलाखती करिता पात्र होण्या करिता लेखी परीक्षेत किमान 45 % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
3. वरील पदक्रमांक 1 करीता उमेदवारांची मुलाखत घेण्यात येणार असल्याने लेखी परीक्षेमध्ये व मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
4. वरील पदक्रमांक 2 ते 6 पदांकरीता मुलाखत घेण्यात येणार नसल्याने लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार निवड केली जाईल.
5. ज्या पदांकरिता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदांकरीता मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता 12 वी) च्या दर्जाच्या समान राहील.
6. लेखी परिक्षा, कागदपत्रे छाननी, इ. करिता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमा बाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.
7. नैसर्गीक आपत्ती किंवा इतर प्रशासकिय अडचणींमुळे विहीत दिनांकास लेखी परिक्षा/मुलाखती/कागदपत्र पडताळणी इ. कार्यक्रम आयोजित करणे/घेणे शक्य नसेल तर अध्यक्ष निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धुळे हे ठरवतील त्या प्रमाणे सोयीच्या दिवशी लेखी परिक्षा/मुलाखती/कागदपत्र पडताळणी इ. कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. याबाबत सविस्तर सूचना **www.dhule.nic.in** व **www.drdadhuleexam.com** व **www.dhulezp.mahapanchayat.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.
8. उमेदवाराने परीक्षेस उपस्थित राहतेवेळी प्रवेशपत्र शिवाय स्वतःचे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. (आधार कार्ड / पॅन कार्ड / निवडणूक ओळखपत्र / वाहन परवाना इ. )

**पदांच्या निवडीसाठी कार्यपद्धती, अटी, शर्ती.**

1. लेखी परीक्षेअंती उमेदवारांचे प्राप्त गुण, जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्र पडताळणी/तोंडी परिक्षे करिता अंतरिम स्वरुपात यादि जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, मूळ कागदपत्रांच्या आधारे परीपुर्ण सिद्ध होईल अश्याच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्या करीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपुर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवारांची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा अश्या उमेदवारांचे मागीतलेले सामाजिक आणी/किंवा समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिलीकरण, परिक्षा शुल्क इ. सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

**2. अंतिम निवड**

अ) उमेदवारांची अंतिम निवड हि लेखी परिक्षा व मुलाखतीमध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकःप्रानिम 1216/(प्र.क्र.65/16)/13-अ, दिनांक 13 जून, 2018 नुसार

ब) लेखी परीक्षेचा निकाल तयार करताना परीक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल :-

1) आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. यानंतर

2) वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. यानंतर

3) समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणा-या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

3) वरील अनु. क्र. 1, 2 व 3 या तिन्ही अटींमध्ये समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतम गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

**टिपः**

आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या पाल्य म्हणजे शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एससीवाय-1205/प्र.क्र.189/म-7, दिनांक 23 जानेवारी, 2006 अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास शेतक-याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा मृत शेतक-याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी) होय.

**सर्वसाधारण अटी**

1. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकार-यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

2. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

3. निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून उपरोक्त सेवा करण्याकरीता शारिरीक क्षमतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

4. उमेदवाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल.

5. नियुक्तीपूर्वी मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला आवश्यकता असल्यास अद्ययावत नॉनक्रिमीलेअर दाखला तसेच आवश्यक ती मूळ कागदपत्रे इत्यादीची छाननी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाही. छाननीअंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास/ माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही/ नियुक्ती रद्द होईल.

**ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत**

1. प्रस्तुत पदांकरीता फक्त **www.drdadhuleexam.com** या अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी. व मोबाईल क्रमांक चूकिचा/अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्या द्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहीती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी. व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, धुळे हे जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

2. पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज **www.drdadhuleexam.com** या वेबसाईटद्वारे दि. 24/06/2019 ते दि. 08/07/2019 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

3. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

4. उमेदवाराची लेखीपरीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत कागदपत्रांच्या पूर्ण छाननी व तोंडी परीक्षे नंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखीपरिक्षेच्या प्राथमिक चाळणी नुसार गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांचीसखोल छाननी केली जाईल/तोंडी परीक्षा घेतली जाईल. तोंडी परीक्षेस गैरहजर राहणा-या उमेदवारांचा विचार अंतिम निवडी करीता केला जाणार नाही. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हा अभियान संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, धुळे यांचे जवळ राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

5. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना www.drdadhuleexam.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. बँकेत परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक 10/07/2019 असा राहील. अंतिम दिनांका नंतर बँकेत परीक्षा शुल्क भरणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.
6. संकेतस्थळावर, ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतरच्या पुढील कार्यालयीन दिवशी खालीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने प्रकिया शुल्क भरता येईल.

- स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) च्या कोणत्याही शाखेत रोखीने चलनाद्वारे किंवा SBI Collect द्वारे नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड वापरुन ऑनलाईन पद्धतीने.

  संकेतस्थळावरुन प्राप्त होणा-या चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फत चलनात नमूद असलेली आवश्यक ते प्रक्रिया शुल्क स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरता येईल. सदरच्या 3 प्रतींपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, धुळे प्रत स्टेट बँक ऑफ इंडिया कडून परत मिळेल. त्यापैकी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, धुळे, प्रत उमेदवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी जमा करावी. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी / मुलाखत घेतली जाणार नाही. नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड द्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरण्याच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यास Payment Receipt जतन करुन ठेवा.बँकेत प्रक्रिया शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक दि. 26/06/2019 ते 10/07/2019 पर्यंत आहे. प्रक्रिया शुल्क भरण्याच्या अंतिम दिनांका नंतर प्रक्रिया शुल्क भरणा-या उमेदवारांचा

विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. **ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी** (Payment Transaction Successful) **झाल्याची खात्री करुन घ्यावी. प्रक्रिया शुल्क भरण्याकरीता नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड वापरुन होणा-या व्यवहारांची जबाबदारी संपुर्णतः उमेदवाराची आहे व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, धुळे यास जबाबदार असणार नाही.**

7. वरीलपैकी कोणत्याही पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दोन (2) दिवसानंतर **www.drdadhuleexam.com** या संकेतस्थळावर लॉग इन करुन उमेदवाराला प्रक्रिया शुल्क नोंदीची स्थिती तपासता येईल. तसेच अर्जाची प्रिंट काढता येईल.

8. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वतःचे अद्ययावत 3.5 से.मी. **X** 4.5 से.मी. आकारातील "JPG/JPEG/BMP" या प्रकारचे स्कॅन केलेले छायाचित्र (Photo) व पांढ-या स्वच्छ कागदावर काळ्या शाईच्या पेनने स्वतः स्वाक्षरी करुन स्कॅन केलेली, 1.5 से.मी. **X** 3.5 से.मी. आकारातील "JPG/JPEG/BMP" प्रकारची स्वाक्षरी (Signature) स्कॅन करुन विहित पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. (छायाचित्र व स्वाक्षरी च्या स्कॅन केलेल्या ईमेजचा फाईल साईज 150 **KB** पेक्षा जास्त नसावा, त्यापेक्षा मोठी फाईल अपलोड होणार नाही.)

9. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारीख व वेळेनंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल

10. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित प्रक्रिया शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा/ वेळापत्रक/ परिक्षाकेंद्र/ बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

11. विहित वयोमर्यादेतील शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावे व अशा परवानगीची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे व ती कागदपत्रे छाननीवेळी सादर करावी.

12. ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/ समाजकल्याण आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांना वरील भरतीच्या पदासाठीच्या लेखी परिक्षेसाठी स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहिल. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

13. शासननिर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, राक्रीधो-2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2 दि. 1 जुलै 2016 मधील तरतुदीनुसार प्राविण्यप्राप्त खेळाडू या समांतर आरक्षणाची मागणी केलेल्या उमेदवारांपैकी लेखी परीक्षेअंती जे उमेदवार कागदपत्र पडताळणीस पात्र ठरतील अशा उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीच्या वेळी मा. विभागीय उपसंचालक क्रिडा व युवकसेवा यांचेकडून क्रिडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो या बाबत प्रमाणित केलेले विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे

14. अंशकालीन उमेदवारांनी, त्यांनी सुशिक्षीत बेरोजगार अर्थसहाय्य या योजने अंतर्गत तीन वर्षे दरमहा मानधनावर अंशकालीन काम केलेल्या पदवीधर / पदविकाधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे व तशी नोंद ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

15. माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केलेली असणे आवश्यक आहे, सदर प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावे लागेल.

16. भूकंपग्रस्त /प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी शासन नोकरी मिळणेबाबत सक्षम अधिकारी यांचे विहीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

17. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्तजाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियमक्र.8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), आणि भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक 31/03/2019 नंतरचे/अद्ययावत (नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

18. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी)- सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील (एसईबीसी) उमेदवारांकरिता शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांकः बीसीसी -10/2018/प्र.क्र.130/मावक, दिनांक 7 डिसेंबर 2018 अन्वये करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. या प्रवर्गातील आरक्षणाचे लाभाकरीता अलिकडील/नविनतम मुळ नॉन क्रिमीलियर प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

19. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS)- खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) उमेदवारांकरिता सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक राआधो-409/प्र.क्र.31/16-अ, दिनांक 12 फेब्रुवारी, 2019 अन्वये विहित करण्यात आलेले कागदपत्रे/पुरावा (परिशिष्ट-क) आणि घोषणापत्र (परिशिष्ट-ड) हे कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या/उमेदवाराच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. 8 लाखाच्या आत असले पाहिजे व ती व्यक्ती किंवा तिचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात दि. 13 ऑक्टोंबर 1967 रोजी किंवा त्यापूर्वीचे रहिवासी असणे आवश्यक आहे.
सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक 12.02.2019 नुसार खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) उमेदवारांना वय, परीक्षा फी व इतर अनुज्ञेय सवलती हया इतर मागास प्रवर्गास राज्य शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या नियमानुसार राहतील.

20. अपंग संवर्गातील उमेदवाराकडे किमान अपंगत्वाचे प्रमाण40 टक्के असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे विहीत प्रमाणपत्र असावे. अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडील परिपत्रक क्र. अकआ/प्र-7/लेखनिक-सुविधा/2006-07/2951, दि. 20/12/2006 अन्वये शैक्षणिक परीक्षा / नेमणुकीसाठी घ्यावयाची परिक्षा यासाठी अपंग उमेदवारांना लेखनिकाची सवलत देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे देणेत आलेली आहे. त्यानुसार लेखनिकाचे सहाय्य घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरताना लेखनिकाची मागणी नोंदविणे आवश्यक राहील. तथापि, तशी मागणी न केल्यास लेखनिकाचे सहाय्य मिळणार नाही. तसेच, लेखनिक व उमेदवार हे एकाच शाखेचे असल्यास सदर लेखनिक सहाय्यकाची शैक्षणिक अर्हता संबंधित पदासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेपेक्षा एक पायरी / टप्पा कमी असणे आवश्यक आहे. तथापी लेखनिक व उमेदवार भिन्न शाखेचे असल्यास त्यास ही अट लागू राहणार नाही. अपंग प्रवर्गातील पात्र उमेदवारांची अंतिम नियुक्ती ही स्थायी वैद्यकीय मंडळाच्या पात्रता प्रमाणपत्राच्या आधारे करण्यात येईल.

21. ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे अनिवार्य आहे. शासन निर्णय महिला व बालकल्याण क्र. 82/2001/म.से.आ-2000/प्र.क्र.415/का.2, दि.25/05/2001 मधील तरतूदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहिल या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी वर्ष2019-20 या कालावधी करिता वैध असलेले (अद्ययावत अर्थात 31/03/2020 पर्यत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

22. सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 28 मार्च 2005 व शासन परिपत्रक एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 01 जुलै 2005 नुसार विहित केलेल्या नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा(लहान कटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना(अ) आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन बंधनकारक आहे.

23. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच, नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

24. आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) निवड अंती सादर करणे आवश्यक आहे.

25. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-2011/ प्र.क्र.1064/2011/16-ब दि. 12/12/2011 मधील तरतुदीनुसार, याचिका क्र. 2136/2011 व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. 25/08/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून 06 महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

26. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती रद्द करण्यांत येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल

27. अपात्र अर्जदारांस स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही

28. लेखी परीक्षेस/तोंडी परीक्षेस/ कागदपत्र पडताळणीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

29. वरील अटी, शर्ती, नियमांव्यतिरीक्त शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

30. प्रस्तुत भरती प्रक्रियेच्या वेळोवेळी शासनाकडुन प्राप्त होणा-या सूचनेप्रमाने कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदरील प्रक्रियेत काही बाबी नमूद करावयाच्या राहिल्यास किंवा अनावधानाने चूकीच्या नमूद केलेल्या असल्यास त्याबाबत प्रचलीत शासन निर्देशांनुसार/ निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. सदर भरती प्रक्रियेबाबत काही शंका असल्यास जिल्हा अभियान व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान, धुळे यांना कार्यालयीन वेळेत समक्ष भेटावे.

**परीक्षा शुल्क:-**

पुढील प्रमाणे शुल्क भरावे लागेल. खुला प्रवर्ग – रु. 375/- मागास प्रवर्ग – रु. 275/-

माजी सैनिकांना परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही.

**टिपः** – चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या शाखेत प्रक्रिया शुल्क भरल्यास रु. 60/- इतके सेवा शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.SBI Collect द्वारे नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड द्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यास निवडलेल्या पर्यायानुसार आवश्यक ते बँकेचे सेवा शुल्क भरावे लागेल.

- **ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (Payment Transaction Successful) झाल्याची खात्री करुन घ्यावी. प्रक्रिया शुल्क भरण्याकरीता नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड वापरुन होणा-या व्यवहारांची जबाबदारी संपुर्णतः उमेदवाराची आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, धुळे यास जबाबदार असणार नाही.**

**रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र | भरती प्रक्रिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| 1 | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दिनांक 24/06/2019 ( सकाळी 12-00 पासून) ते<br>दिनांक 08/07/2019 ( सायंकाळी 5-30 पर्यंत) |
| 2 | बँकेत प्रक्रिया शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक 10/07/2019 |

**विशेष सूचना:-**

या परीक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करायाची आवश्यकता नाही, तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करू नयेत.

अर्जदारांना ऑनलाईन भरण्या संदर्भात काही तांत्रिक अडचणी असल्यास त्यासाठी **Helpline Number 8605628872** वर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कामकाजाच्या वेळेत (सकाळी 11 ते सायंकाळी 5) संपर्क साधावा.

दिनांकः 17/06/2019

**xxx**
**जिल्हा अभियान व्यवस्थापक**
**महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान**
**जिल्हा धुळे**

**xxx**
**जिल्हा अभियान सहसंचालक**
**प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.य**
**जिल्हा धुळे**

**xxx**
**जिल्हा अभियान संचालक**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा धुळे**